**MHAH**160005832022

## फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक १७६/२०२२ मधील निशाणी १० खालील आदेश

१. प्रस्तुत मुळ अर्ज व्यथित व्यक्तीने सामनेवालाविरुध्द महिलांचे घरगुती हिंसाचापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ नुसार न्यायप्रविष्ठ केला आहे. सामनेवाला यांस अर्जाचे समन्सची बजावणी झाली असून ते अर्जाकामी हजर झालेले आहेत.

२. अर्ज नि. १२ हा सामनेवाला क्र. १ यांनी दाखल करुन विनंती केली आहे की, त्यांना अर्जाची समन्सची बजावणी झालेनंतर ते अर्जाकामी हजर झाले परंतु म्हणणे देण्याकामी आवश्यक त्यांना उशिर झाला तसेच त्यांचे विधिज्ञांना आवश्यक ती माहिती वेळेत उपलब्ध करुन न देता आलेने दरम्यानच्या कालावधीमध्ये त्यांच्याविरुध्द विनाम्हणणे आदेश पारीत झाला आहे. सबब त्यांनी अशी विनंती केली आहे की, त्यांना प्रस्तुत कामी म्हणणे देण्यास झालेला उशिर माफ करुन झालेला विनाम्हणणे आदेश बाजूला सारण्यात यावा.

३. याउलट व्यथित व्यक्तीचे वतीने प्रस्तुत अर्जास विरोध दर्शवित म्हणणे देण्यात आले आहे की, प्रस्तुत अर्ज हा खोटा आणि बनावट आहे. सामनेवाला यांस पुरेसा अवधी मिळुनही केवळ प्रकरण लांबणीवर टाकण्याकरिता जाणीवपुर्वक त्यांनी अर्जास म्हणणे दिलेले नाही. सबब अर्ज नामंजुर करावा यदाकदाचित अर्ज मंजुर करावा असे मत झाल्यास तो जबर खर्चासह मंजुर करावा.

४.		मुळ अर्ज पाहिला. सामनेवाला यांनी न्यायप्रविष्ठ केलेला अर्ज अभ्यासला.  प्रस्तुत मुळ अर्ज व्यथित व्यक्तीने सामनेवालाविरुध्द महिलांचे घरगुती हिंसाचापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ नुसार न्यायप्रविष्ठ केला आहे.  सामनेवाला यांस अर्जाचे समन्सची बजावणी झाली असून ते अर्जाकामी हजर झालेले आहेत. परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे अर्जाकामी वेळेत न दिलेले त्यांच्याविरुध्द विनाम्हणणे आदेश पारीत झाला आहे. मुळ अर्जाचे स्वरुप लक्षात घेता अर्जाच्या योग्य त्या निर्गतीकरिता सामनेवाला यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल असणे गरजेचे आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचीत आहे. परंतु अर्जाकामी आणि म्हणणे देण्याकामी झालेला उशीर पाहता योग्य ती खर्चाची रक्कम सामनेवालावर लादणेही गरजेचे आहे. परिणामी खालील आदेश –

## **<u>आदेश</u>**

१.	अर्ज नि. १२ सामनेवाला क्र. १ यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/– भरण्याच्या अटीसह सामनेवाला क्र.१ यांना अर्जाकामी म्हणणे देण्यास झालेला उशिर क्षमापित करण्यात येतो तसेच त्यांच्याविरुध्द पारीत विनाम्हणणे आदेश बाजूला सारण्यात येतो.

२.	सामनेवाला यांनी खर्चाची रक्कम रुपये ५००/– ची पुर्तता केलेनंतर ती अर्जदार यांसी देण्यात यावी.

दिनांक २३.०१.२०२४						( एस.अे. पर्वतकर )
अकोले						न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले.